पालिकेतर्फे मिळाले तीनशे जणांना घरकुल

कायदे टिकवण्यासाठी पुन्हा संघर्ष करण्याचा कामगारांचा निर्धार

इनक्युबेशन सेंटरमुळे शहरातील विद्यार्थ्यांच्या कल्पनेला वाव

एचआयव्ही सहजीवन जगणाऱ्या बालकांनी लुटला बालदिनाचा आनंद

इंद्रनील कदम, तनिष सावंत बालकांच्या वेशभूषा स्पर्धेत प्रथम

वेशभूषेने वेधले उपस्थितांचे लक्ष

सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थितांची दाद

कुणेनामा शाळा : ज्ञान वाढविण्यासाठी सेमी इंग्रजीविषयाचे प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

लोणावळा : कुणेनामा येथील जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

डेल्ला ग्रुपच्या वतीने कुणेनामा येथील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेतली असून, आठवीचा खासगी वर्ग सुरु केला आहे. याकरिता आवश्यक असणारा शिक्षक वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे. केवळ मातृभाषेचे ज्ञान असून उपयोगाचे नाही, आयुष्यात यशस्वी होण्याकरिता मराठी भाषेप्रमाणेच हिंदी व इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असल्याने कुणेनामा जिल्हा परिषद शाळेत सेमी इंग्रजी सुरु करण्यात आली आहे.

चांगल्या दर्जाचे शिक्षक, मुलांना कराटे व मार्शल आर्ट, स्विमिंग रॅपलिंग, नेमबाजी, योगा, गायन, वादन, नृत्य याचे प्रशिक्षण हे प्रख्यात तज्ज्ञाकडून दिले जात आहेत. या ठिकाणी शिकणाऱ्या १६० मुलांचे पालकत्व डेल्ला समूहाने घेतले आहे त्यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण ते नोकरीपर्यंत सर्व जबाबदारी मिस्त्री यांनी घेतली आहे. लहान वयापासून मुलांना माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली असून याठिकाणाहून बाहेर पडणारा प्रत्येक मुलगा या मुलगी ही आत्मविश्वासासोबत मल्टी टॅलेंटेड असतील असा विश्वास जिमी मिस्त्री यांनी व्यक्त केला. डेल्ला जिल्हा परिषद शाळेचे दुसरे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्त मिस्त्री यांनी ग्रामस्थ व पालकांशी संवाद साधला.

शाळेत शिकणारी बहुतांश मुले ही ठाकर व कातकरी समाजातील आहेत, ज्या मुलांना मराठी निट बोलता येत नाही त्यांचे इंग्रजीमधील बोलणे ऐकून उपस्थित मान्यवर आवाक झाले. डेल्ला समूहातील उच्च पदस्थ प्रशिक्षक हा मुलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देत आहेत, त्यांचा आदर्श घेत इतर ठिकाणच्या जिल्हा परिषद शाळांना देखील दानशूर समूहांचे पालकत्व मिळाल्यास सर्वसामान्य कुटुंबातील मुलांचा विकास होण्यास हातभार लागेल असे मत शाळेचे मुख्यध्यापक सहादू मानकर यांनी याप्रसंगी कृतज्ञता व्यक्त केली.

कलाविष्कार : डेल्ला ग्रुपच्यावतीने मुलांनी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम.